# घरोघरी लसीकरण करण्याबाबत पुनर्विचार करा!

## उच्च न्यायालयाची केंद्र सरकारला सूचना

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** ज्येष्ठ नागरिक आणि शारीरिक व्यंग असलेल्यांना वाऱ्यावर सोडले जाऊ शकत नाही. उलट त्यांची अडचण समजून घेणे गरजेचे आहे, असे नमूद करत घरोघरी जाऊन लसीकरण करणे अशक्य असल्याच्या आपल्या भूमिकेवर फेरविचार करण्याची सूचना मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी केंद्र सरकारला केली.

ज्येष्ठ नागरिक आणि अपंग व्यक्तींना घरोघरी जाऊन लसीकरण करण्याबाबत दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेची मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या खंडपीठासमोर गुरुवारी सुनावणी झाली. न्यायालयाने केंद्र शासनाच्या भूमिकेबाबत नाराजी व्यक्त केली. तसेच ज्येष्ठ आणि गंभीर आजार असलेल्या लोकांचेच तातडीने लसीकरण करण्याची गरज असून त्यासाठी अतिदक्षता विभागाची वा फ्रिजची सुविधा असलेल्या रुग्णवाहिका उपलब्ध केल्या जाऊ शकतात, असेही न्यायालयाने म्हटले आहे. बरेच ज्येष्ठ नागरिक आणि शारीरिक व्यंग असलेल्या लोकांना आरोग्याच्या कारणास्तव घराबाहेर पडणे शक्य नाही. त्यामुळे लस दूषित होईल वा वाया जाईल, असे सांगून घरोघरी लसीकरण शक्य नसल्याचे सांगू नका आणि हा विषय बंद करू नका, असेही न्यायालयाने सुनावले.



### इस्त्रायल-लॉस एंजेलिसचा दाखला...

भारतीय संस्कृतीत लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना प्राधान्य दिले गेले आहे. लहान मुले व ज्येष्ठ नागरिक त्यांची काळजी घेण्यासाठी असमर्थ असल्यामुळे आपल्याला त्यांची काळजी घ्यावी लागेल. करोनासारख्या महासाथीपासून वाचण्याचा लसीकरण हा सध्या एकमेव मार्ग आहे, असे सांगताना न्यायालयाने या वेळी इस्त्रायल व लॉस एंजेलिसचे उदाहरण दिले. इस्त्रायलमध्ये निम्म्याहून अधिक जनतेचे लसीकरण झाले असून लॉस एंजेलिसमध्ये कारमध्ये बसूनही लसीकरण केले जात आहे. आपणही असे मार्ग अवलंबण्याची आवश्यकता असल्याचे न्यायालयाने म्हटले.

### केंद्राचा दावा...

बऱ्याचशा ज्येष्ठ नागरिकांना गंभीर आजार असतात. त्यामुळे लसीकरणानंतर त्यांना ३० मिनिटे वैद्यकीय देखरेखीखाली ठेवावे लागेल. घरोघरी जाऊन लसीकरण केल्यास हे शक्य होणार नाही, असा दावा केंद्र सरकारतर्फे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल अनिल सिंह यांनी केला.

### उपलब्धतेविषयी प्रसारमाध्यमांतून माहिती द्या...

सध्या घडीस केवळ तीन ते चार दिवसच पुरेल एवढा लशीचा साठा उपलब्ध आहे, मात्र लवकरच हा साठा उपलब्ध होईल, असे राज्य सरकारतर्फे महाधिवक्ता आशुतोष कुंभकोणी यांनी न्यायालयाला सांगितले. त्यावर न्यायालयाने चिंता व्यक्त केली. तसेच नागरिकांचा त्रास थांबवण्यासाठी कोणत्या लसीकरण केंद्रावर लस उपलब्ध आहे, ती किती प्रमाणात उपलब्ध आहे, याची माहिती प्रसारमाध्यमांतून प्रसिद्ध करण्याचे आदेश न्यायालयाने या वेळी सरकार आणि पालिकेला दिले.

# अठरा वर्षांवरील विद्यार्थ्यांना विद्यापीठ आणि महाविद्यालयांत लस

**मुंबई :** राज्यातील १८ ते २५ वयोगटातील विद्यार्थ्यांचे करोना लसीकरण महाविद्यालय किंवा विद्यापीठाच्या माध्यमातून करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी गुरूवारी दिली.

देशभरातील १८ वर्षांवरील नागरिकांना १ मेपासून लस देण्यास केंद्राने परवानगी दिली आहे. सध्या राज्यातील महाविद्यालये, विद्यापीठांशी साधारण ३६ लाख ८७० विद्यार्थी संलग्न आहेत. या विद्यार्थ्यांचे विद्यापीठ व महाविद्यालयातच लसीकरण करण्यात येणार आहे. याबाबत राज्यपाल, मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री यांच्याशी चर्चा करून अंतिम योजना जाहीर करण्यात येईल असे सामंत यांनी सांगितले.

करोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंची बैठक सामंत यांनी घेतली. त्यावेळी लसीकरण मोहिमेबरोबरच विद्यापीठांच्या परीक्षा, पुढील शैक्षणिक वर्षाचे नियोजन यांबाबत चर्चा करण्यात आली. शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू करण्यात येणार असून याबाबत येत्या १५ दिवसांत निर्णय घेण्यात येईल. सर्व परीक्षा घेत असताना एकही विद्यार्थी करोनाबाधित होणार नाही, याची विशेष काळजी घेण्यात येईल. सर्व परीक्षा ऑनलाइनच होतील. विद्यार्थ्यांचे आरोग्य हे सर्वांच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. विविध प्रवेश परीक्षांचे वेळापत्रकही लवकरच जाहीर करण्यात येईल, असे सामंत यांनी सांगितले. उच्च शिक्षण विभागाचे संचालक धनराज माने, तंत्रशिक्षण संचालक अभय वाघ, सीईटी सेल आयुक्त चिंतामणी जोशी, कला संचालक राजीव मिश्रा हेदेखील या वेळी उपस्थित होते.

### दहावीच्या मूल्यमापन योजनेची प्रतिक्षा...

दहावीनंतर तंत्रशिक्षण पदविका अभ्यासक्रमाला (पॉलिटेक्निक) प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही मोठी आहे. दहावीची परीक्षा रद्द झाल्यामुळे या अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबतही पेच निर्माण झाला आहे. 'दहावीच्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन कसे करण्यात येणार आहे त्याची योजना जाहीर झाल्यानंतर पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत निर्णय घेण्यात येईल,' असे सामंत यांनी सांगितले.

### ४८ खासगी केंद्रे बंद, तरीही लसीकरण वेगात

मुंबई : लससाठ्याअभावी गुरुवारी देखील ४८ खासगी लसीकरण केंद्रे बंद ठेवण्याची वेळ आली; मात्र पालिकेच्या ४२ केंद्रांवर लसीकरण सुरू होते. दिवसभरात तब्बल ४८ हजारांहून अधिक लोकांचे लसीकरण करण्यात आले. मुंबईतील लसीकरण केंद्रांची संख्या टप्प्याटप्प्याने वाढवली जात आहे. सध्या मुंबईत १३२ केंद्रांवर लसीकरण होते आहे. त्यापैकी ४२ पालिकेची केंद्रे आहेत, तर ७३ खासगी केंद्रे व १७ केंद्रे राज्य व केंद्र सरकारी रुग्णालयात आहेत. गुरुवारी एकूण ४८ हजार १५२ लोकांना लस देण्यात आली. त्यापैकी २१ हजार ९९० लोकांनी लशीची दुसरी मात्रा घेतली तर, २६ हजार १६२ लोकांनी पहिली मात्रा घेतली. खासगी केंद्रांवर दिवसभरात केवळ २ हजार ८०० लोकांनाच लस देता आली. मात्र पालिकेच्या केंद्रांवर तब्बल ३८ हजारांहून अधिक लोकांना लस देण्यात आली. सध्या एकूण २१ लाखांहून अधिक लोकांचे लसीकरण झाले आहे.

# दोन आठवड्यांत २६ पोलिसांचा मृत्यू

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** गेल्या दोन आठवड्यांत करोना संसर्ग झालेल्या २६ अधिकारी, अमलदारांचा मृत्यू झाल्याची माहिती राज्य पोलीस मुख्यालयातून देण्यात आली. गेल्या वर्षी मार्चपासून आतापर्यंत एकूण ३९० पोलीस करोनाने मृत्युमुखी पडले.

संसर्ग पसरू नये यासाठी प्राधान्याने पोलीस दलात लसीकरण सुरू करण्यात आले. मात्र लसीकरणाचा पहिला टप्पा अद्याप पूर्ण झालेला नाही. त्यातच दुसरी लाट थोपवण्यासाठी लादण्यात आलेल्या कठोर निर्बंधांच्या अंमलबजावणीची जबाबदारी पोलिसांवर आली.



ही जबाबदारी पेलताना पोलीस दलातील संसर्ग प्रसार आणखी वाढण्याची शक्यता आहे.

वर्षभरात राज्य पोलीस दलातील ३४ हजार ५८७ अधिकारी अंमलदार बाधित झाले. सध्या ३ हजार ७०० जण उपचार घेत आहेत.

तर मुंबई पोलीस दलातील ८ हजार ३७२ अधिकारी, अंमलदार बाधित झाले आहेत. त्यापैकी ७ हजार ५९८ जणांनी करोनावर मात केली. यातील बहुसंख्य अधिकारी कामावर रुजू झाले आहेत.

सिडको
शहरांचे शिल्पकार

शुध्दिपत्रक क्र. ०३
नवी मुंबईच्या खारघर आणि नवीन पनवेल (पू.) नोडमधील १९ भूखंड भाडेपट्ट्यावर देण्याच्या ई-निविदा तथा ई-लिलाव प्रकियेस मुदतवाढ
योजना क्र.: सिडको/एमएम/यो.-०९/२०२०-२०२१


सिडको महामंडळातर्फे वरील योजनेअंतर्गत **नवी मुंबईच्या खारघर आणि नवीन पनवेल (पू.) नोडमधील १९ भूखंड भाडेपट्ट्यावर उपलब्ध** करून देण्यात आले होते.

उपरोक्त योजने संदर्भात अर्ज सादर करण्याची व अनामत रक्कम भरण्याची सुधारित तारीख २२ एप्रिल २०२१ ऐवजी **०३ मे २०२१ (१७ वाजेपर्यंत)**, बंद निविदा सादर करण्याची सुधारित तारीख २३ एप्रिल २०२१ ऐवजी **०४ मे २०२१ (२३.५९वाजेपर्यंत)**, ई-लिलावाची सुधारित तारीख २४ एप्रिल २०२१ ऐवजी **०५ मे २०२१ (१७ वाजेपर्यंत)** आणि निकालाची सुधारित तारीख २६ एप्रिल २०२१ ऐवजी **०६ मे २०२१ (१५ वाजता)** अशी असणार आहे.

**सर्व इच्छुक अर्जदारांकडून अर्ज करणे, बंद निविदा सादर करणे, ई-लिलाव आणि निविदा उघडणे या प्रकियांच्या सुधारित तारखांची नोंद घेण्यात यावी, ही विनंती.**

पणन व्यवस्थापक
CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३५०(क)/२०२०-२१

हेल्थ टिप्ससाठी आजच tanviherbals.com साईट व्हिजीट करा




निरोगी राहण्यासाठी
रोज घ्या 2
तन्वीशता टॅबलेट्स
तेजस्वी त्वचा, दाट केस, शक्तीस्फूर्तीसाठी
ॲसिडीटी, थकवा, डोकेदुखी, पिंपल्स इत्यादींवर
आजच ऑनलाईन विकत घ्या
Buy Tanvi Products online on www.tanviherbals.com
केमिस्टकडे, तन्वी क्लिनिक्समध्ये उपलब्ध For Home Delivery : 9820075813
तन्वी क्लिनिक फ्री चेकअप : घंटाळी ठाणे 9769695892, दादर 9833683621
सर्व आरोग्य तक्रारींवर मोफत व्हाट्सअप आरोग्यसल्ला
डॉ मेधा : 7045589981, डॉ मानसी : 9769905892
तन्वी संचालक : 9833001716 | Follow Us On : Facebook & Youtube

# ...तर धूम्रपानावरही तात्पुरती बंदी हवी!

## करोनाच्या पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाचे मत

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** गेल्या वर्षी करोनाबाधित झालेल्या, करोनाने मृत्युमुखी पडलेल्यांपैकी किती जण धूम्रपान करणारे होते?, याचा काही अभ्यास झाला आहे का?, असा अभ्यास झाला असेल आणि त्यातून दुष्परिणाम झाल्याचे पुढे आले असल्यास तात्पुरत्या काळाकरिता धूम्रपानावर बंदी घालायला हवी, असे मत मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी व्यक्त केले.

राज्यात करोना उपचारांच्या व्यवस्थापनात मोठ्या प्रमाणात ढिसाळपणा असल्याचा आरोप करणाऱ्या जनहित याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या खंडपीठासमोर गुरुवारी सुनावणी झाली. त्या वेळी न्यायालयाने धूम्रपान आणि करोनाबाबतच्या अभ्यासाबाबत केंद्र आणि राज्य सरकारला विचारणा केली. ॲड. धृती कपाडिया यांनी याबाबतचा अभ्यास झालेला असल्याचे न्यायालयाला सांगितले. त्यांनी त्याबाबतची प्रसिद्ध झालेली माहितीही या वेळी न्यायालयासमोर सादर केली. त्यानंतर जागतिक आरोग्य संघटनेतर्फेही अशा प्रकारचा अभ्यास केला गेला आहे का, याबाबत माहिती घेऊन सादर करण्यास न्यायालयाने सांगितले.

धूम्रपान करणे हा मूलभूत हक्क असून आपण कुठेही, कधीही धूम्रपान करू शकतो, असे नागरिकांकडून म्हटले जाऊ शकते. परंतु सार्वजनिक हिताच्या दृष्टीनेही करोनास्थितीचा विचार करायला हवा. सरकारनेही त्याकडे लक्ष द्यायला हवे. तसेच अशा प्रकारच्या अभ्यासातून दुष्परिणाम समोर आल्यास तात्पुरत्या काळाकरिता धूम्रपानावर बंदीचा घालण्याचा विचार करायला हवा, असे न्यायालयाने म्हटले.

### मुद्दा काय?

धूम्रपानामुळे फुफ्फुसांवर परिणाम होतो आणि करोनाही फुफ्फुसांशी संबंधित आजार आहे. त्यामुळे गेल्या वर्षी करोनाबाधित झालेल्या, करोनाने मृत्युमुखी पडलेल्यांपैकी किती जण धूम्रपान करणारे होते याचा काही अभ्यास झाला आहे का?, असा अभ्यास झाला असेल आणि त्यातून दुष्परिणाम झाल्याचे पुढे आले असल्यास काही काळाकरिता धूम्रपानावर बंदी घालायला हवी, असे न्यायालयाने म्हटले आहे.

# पारपत्र कार्यालये बंद

**मुंबई :** गुरूवारी रात्री ८ वाजल्यापासून राज्यात लागू झालेल्या टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर सर्व पारपत्र (पासपोर्ट) कार्यालये आणि टपाल कार्यालयांतील पारपत्र सेवा केंद्रे १ मे रोजी सकाळी ७ वाजेपर्यंत बंद ठेवण्यात येणार आहेत. मुंबईतील क्षेत्रीय पारपत्र कार्यालयाचे चौकशी केंद्र आणि या कार्यालया अंतर्गत असलेल्या सर्व पासपोर्ट सेवा केंद्रे आणि टपाल कार्यालयांतील पासपोर्ट सेवा केंद्रांमधील सेवा ३० एप्रिलपर्यंत बंद राहणार आहे. आधीच वेळ निश्चित केलेल्या अर्जदारांना सेवा प्रदाता कंपनी टीसीएसने लघुसंदेशाद्वारे सूचित केले आहे. १ मेपर्यंत कोणत्याही पारपत्र कार्यालयात अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्जदार ०२२-२६५२००१६/१७ या क्रमांकावर किंवा rpo.mumbai@mea.gov.in या ईमेल आयडीवर संपर्क साधू शकतात अथवा www.passportindia.gov.in या संकेतस्थळाला भेट देऊ शकतात. क्षेत्रीय पारपत्र कार्यालयाच्या ट्विटर आणि फेसबुक खात्याचे अनुसरण करू शकतात.

Godrej agrovet

गोदरेज ॲग्रोवेट लिमिटेड
**नोंदणीकृत कार्यालय :** ''गोदरेज वन'', ३ रा मजला, पिरोजशानगर, पूर्व द्रुतगती महामार्ग, विक्रोळी (पूर्व), मुंबई – ४०० ०७९, महाराष्ट्र.
**दूर. :** ०२२-२५१९ ४४१६ **फॅक्स :** ०२२-२५१९ ५१२४
**वेबसाइट :** www.godrejagrovet.com
**ई-मेल :** gavlinvestors@godrejagrovet.com
**कॉर्पोरेट आयडेंटिटी नंबर (सीआयएन) : L15410MH1991PLC135359**

सूचना

भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन २९ सहवाचन विनियमन ४७ अंतर्गत याद्वारे **सूचना देण्यात येत आहे की,** अन्य बाबींबरोबरच दि. ३१.०३.२०२१ रोजी संपलेल्या तिमाही व वित्तीय वर्षाकरिताच्या कंपनीच्या स्थायी व एकत्रित लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांवर, सदर निष्कर्षांचे लेखा परीक्षण समितीद्वारे मूल्यांकन केल्यानंतर विचारविनिमय करणे व त्यांना मंजुरी देण्यासाठी तसेच ३१.०३.२०२१ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिता कंपनीच्या समभागांवर अंतिम लाभांशाच्या, (काही असल्यास), शिफारशीवर विचारविनिमय करण्यासाठी **गोदरेज ॲग्रोवेट लिमिटेड** (कंपनी) च्या संचालक मंडळाची सभा शुक्रवार, दि. ०७.०५.२०२१ रोजी आयोजित करण्यात येत आहे.

सदर सूचना कंपनीची वेबसाइट (www.godrejagrovet.com) वर तसेच कंपनीचे शेअर्स सूचिबद्ध असलेल्या स्टॉक एक्सचेंजेस अर्थात बीएसई लिमिटेडची वेबसाइट (www.bseindia.com) व नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडची वेबसाइट (www.nseindia.com) वरही उपलब्ध आहे.

भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (अंतर्गत व्यापार प्रतिबंध) विनियमन, २०१५ (पीआयटी विनियमन) व कंपनीच्या अंतर्गत व्यापार प्रतिबंध नियोजन सांकेतांकानुसार (सांकेतांक) दि. ३१.०३.२०२१ रोजी संपलेली तिमाही व वर्षाकरिताच्या कंपनीच्या स्थायी व एकत्रित लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांना मंजुरी देण्याकरिता कंपनीची प्रतिभूतींच्या व्यवहाराची ट्रेडिंग विन्डो कंपनीचे सर्व संचालक व पदसिद्ध व्यक्तींकरिता तसेच पीआयटी विनियमन व सांकेतांकाअंतर्गत विहित त्यांच्या जवळच्या नातेवाईकांकरिता गुरुवार, दि. ०१.०४.२०२१ ते रविवार, दि. ०९.०५.२०२१ दरम्यान (दोन्ही दिवस अंतर्भूत) बंद राहतील.

गोदरेज ॲग्रोवेट लिमिटेडकरिता
सही/-
विवेक रायझादा
प्रमुख – विधि व कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी
ठिकाण : मुंबई
दिनांक : २३.०४.२०२१

IHCL
दि इंडियन हॉटेल्स कंपनी लिमिटेड
सूचना

दि सिक्युरिटिज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सूचीकरण दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियमावली २०१५ च्या नियमन २९ च्या तरतुदींनुसार याद्वारे सुचना देण्यात येते की, **दि इंडियन हॉटेल्स कंपनी लिमिटेडच्या** संचालक मंडळाची सभा ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या तिमाही/वर्षाकरिता, कंपनीचे लेखापरिक्षित स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय निष्कर्ष अन्य बाबींबरोबर विचारात घेवून अभिलेखीत करण्यासाठी, **शुक्रवार, दि. ३० एप्रिल, २०२१** रोजी घेण्याचे नियोजिले आहे.

**नोंदणीकृत कार्यालय :**
मांडलिक हाऊस,
मांडलिक रोड,
मुंबई ४००००१
दिनांकित : २२ एप्रिल, २०२१

बीजल देसाई
वरिष्ठ उपाध्यक्ष - निगम कामकाज आणि कंपनी सचिव (ग्रुप)

CEAT
सीएट लिमिटेड
**सीआयएन:** एल२५१००एमएच१९५८पीएलसी०११०४१
**नोंदणीकृत कार्यालय:** ४६३, डॉ. ॲनी बेसेंट रोड, वरळी, मुंबई – ४०० ०३०
**फोन:** +९१ २२ २४९३ ०६२१; **फॅक्स:** +९१ २२ २४९३ ८९३३
**ईमेल:** investors@ceat.com; **वेबसाइट:** www.ceat.com

सूचना

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँन्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ विनियमन ४७ अंतर्गत सूचना देण्यात येत आहे की, दि. ३१ मार्च, २०२१ रोजी समाप्त झालेल्या तिमाही आणि वर्षाअखेरकरिता इतर बाबींसह कंपनीच्या लेखापरीक्षित वित्तीय (स्वतंत्र आणि एकत्रित) निष्कर्षांवर विचारविनिमय करणे आणि त्यांना मंजुरी देण्याकरिता कंपनीच्या संचालक मंडळाची सभा ऑडिओ–व्हिज्युअल माध्यमातून, बुधवार, दि. ५ मे, २०२१ रोजी आयोजित करण्यात येत आहे.

सदर सूचनेत समाविष्ट माहिती आणि त्याचा पुढील तपशील कंपनीचे संकेतस्थळ म्हणजेच www.ceat.com तसेच स्टॉक एक्स्चेंजची संकेतस्थळे www.bseindia.com आणि www.nseindia.com वरही उपलब्ध असेल.

**सीएट लिमिटेड** करिता
सही/-
**बल्लरी गुप्ते**
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी
दिनांक: एप्रिल २२, २०२१
RPG

INOX
LIVE the MOVIE


आयनॉक्स लिजर लिमिटेड
(CIN: L92199MH1999PLC353754)
नोंदणीकृत कार्यालय : पाचवा मजला, विराज टॉवर्स, अंधेरी उड्डाण पुलाच्या बाजुला, पश्चिम द्रुतगती मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०९३
दूरध्वनी : (+ ९१ २२) ४०६२६९०० / फॅक्स: (+ ९१ २२) ४०६२६९९९
वेबसाईट : www.inoxmovies.com ईमेल आयडी : contact@inoxmovies.com

सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲन्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या विनियम ४७(१) (ए) सोबत वाचावयाच्या विनियम २९ अन्वये, ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या तिमाहीचे आणि वर्षाचे, कंपनीचे लेखापरीक्षित स्वायत्त व एकत्रीकृत वित्तीय निष्कर्ष विचारात घेण्यासाठी आणि अभिलेखावर घेण्यासाठी गुरूवार, २९ एप्रिल, २०२१ रोजी कंपनीच्या संचालक मंडळाची सभा घेण्याचे नियोजिले आहे.

संचालक मंडळाच्या नियोजित सभेची सूचना, कंपनीच्या संकेतस्थळावर (www.inoxmovies.com) आणि कंपनीचे रोखे जिथे सूचिबद्ध आहेत अशा दोन्ही स्टॉक एक्सचेंजेसकडे म्हणजेच बीएसई लिमिटेड (www.bseindia.com) आणि दी नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (www.nseindia.com) या संकेतस्थळावर प्रसारित करण्यात आली आहे.

आयनॉक्स लिजर लिमिटेड करिता
सही/-
पार्थसारथी अय्यंगार
कंपनी सचिव
ठिकाण: मुंबई
दिनांक: २२ एप्रिल, २०२१



पश्चिम रेल्वे
४ उन्हाळी विशेष गाड्यांच्या फेऱ्यांमध्ये वाढ करीत आहेत.

प्रवाशांच्या सुविधेकरिता आणि प्रवास मागणीची पूर्तता होण्याच्या दृष्टीने पश्चिम रेल्वेने खालीलप्रमाणे विविध गंतव्य स्थानकांकरिता **४ उन्हाळी विशेष गाड्यांच्या फेऱ्यांमध्ये वाढ** करण्याचे ठरविले आहे.

| ट्रेन नं. | मूळ व गंतव्य स्थानक | विस्तारित सेवांचे दिवस | प्रस्थान | आगमन |
|---|---|---|---|---|
| ०९०३५ | मुंबई सेंट्रल – मंडुआडीह (सुपरफास्ट विशेष) | २८.०४.२०२१ | २२.३० वा. (बुधवार) | ०८.०० वा. (तिसरा दिवस) |
| ०९०३६ | मंडुआडीह – दादर (सुपरफास्ट विशेष) | ३०.०४.२०२१ | १७.०० वा. (शुक्रवार) | ०४.४५ वा. (तिसरा दिवस) |

**थांबे**: बोरिवली, वापी, सुरत, वडोदरा, रतलाम, कोटा, सवाई माधोपूर, भरतपूर, मथुरा, कानपूर सेंट्रल, लखनौ एनआर., राय बरेली, अमेठी, प्रतापगढ, जंघई, भदोही स्थानके दोन्ही दिशांतील.
**रचना**: एसी २–टिअर, एसी ३–टिअर व स्लीपर क्लास कोचेस

| ट्रेन नं. | मूळ व गंतव्य स्थानक | विस्तारित सेवांचे दिवस | प्रस्थान | आगमन |
|---|---|---|---|---|
| ०९०७३ | वांद्रे (ट) – गोरखपूर (विशेष) | २८.०४.२०२१ व २९.०४.२०२१ | १९.२५ वा. (बुधवार व गुरुवार) | ०६.०५ वा. (तिसरा दिवस) |
| ०९०७४ | गोरखपूर – वांद्रे (ट) (विशेष) | ३०.०४.२०२१ व ०१.०५.२०२१ | १६.१० वा. (शुक्रवार व शनिवार) | ०४.२५ वा. (तिसरा दिवस) |

**थांबे**: बोरिवली, वापी, सुरत, वडोदरा, रतलाम, भवानी मंडी, कोटा, सवाई माधोपूर, बयाना, आग्रा फोर्ट, टुण्डला, इटावा, कानपूर सेंट्रल, लखनौ सिटी, बाराबंकी व बस्ती स्थानके दोन्ही दिशांतील.
**रचना**: एसी २–टिअर कम ३– टिअर, स्लीपर क्लास व सेकंड क्लास सीटिंग कोचेस

| ट्रेन नं. | मूळ व गंतव्य स्थानक | विस्तारित सेवांचे दिवस | प्रस्थान | आगमन |
|---|---|---|---|---|
| ०९०७९ | वांद्रे (ट) – भगत की कोठी (विशेष) | ०१.०५.२०२१ | २३.४५ वा. (शनिवार) | १८.२० वा. (पुढील दिवस) |
| ०९०८० | भगत की कोठी – वांद्रे (ट) (विशेष) | ०२.०५.२०२१ | २०.०० वा. (रविवार) | १४.१० वा. (पुढील दिवस) |

**थांबे**: बोरिवली, वापी, सुरत, वडोदरा, अहमदाबाद, महेसाणा, पालनपूर, अबू रोड, मारवार व पाली मारवार स्थानके दोन्ही दिशांतील.
**रचना**: एसी ३–टिअर, स्लीपर क्लास व सेकंड क्लास सीटिंग कोचेस

| ट्रेन नं. | मूळ व गंतव्य स्थानक | विस्तारित सेवांचे दिवस | प्रस्थान | आगमन |
|---|---|---|---|---|
| ०९५२१ | राजकोट – समस्तीपूर (विशेष) | २८.०४.२०२१ | ११.०० वा. (बुधवार) | ०६.०० वा. (तिसरा दिवस) |
| ०९५२२ | समस्तीपूर – राजकोट (विशेष) | ०१.०५.२०२१ | ०६.२० वा. (शनिवार) | ०३.०५ वा. (तिसरा दिवस) |

**थांबे**: अहमदाबाद, छायापुरी, गोध्रा, रतलाम, कोटा, सवाई माधोपूर, भरतपूर, अछनेरा, मथुरा, हाथरस सिटी, कासगंज, फर्रुखाबाद, कनौज, कानपूर सेंट्रल, ऐशबाग, बाराबंकी, गोंडा, बस्ती, गोरखपूर, देवरिया सदर, सीवान, छपरा, हाजीपूर व मुझफ्फरपूर स्थानके दोन्ही दिशांतील.
**रचना**: एसी २–टिअर, एसी ३–टिअर, स्लीपर क्लास व सेकंड क्लास सीटिंग कोचेस

संबंधित विशेष गाड्यांच्या थांब्यांबाबत सविस्तर वेळांकरिता प्रवाशांनी कृपया www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

निश्चित तिकिटे असलेल्या प्रवाशांनाच केवळ या विशेष गाड्यांमध्ये प्रवेश करण्यास अनुमती देण्यात येईल.

प्रवाशांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी कृपया गाडीत प्रवेश करतेवेळी, प्रवास करतेवेळी व गंतव्य स्थानी पोहोचल्यावर कोव्हिड-१९ संबंधित सर्व निकष, एसओपी'जचे अनुपालन करावे.

ट्रेन नं. ०९०३५, ०९०७३, ०९०७९ व ०९५२१ या गाड्यांच्या विस्तारित फेऱ्यांकरिता बुकिंग २४.०४.२०२१ पासून नामनिर्देशित पीआरएस काऊंटर्सवर व आयआरसीटीसी संकेतस्थळावर सुरू होईल. वरील ट्रेन्स विशेष शुल्कावर पूर्णतः आरक्षित ट्रेन्स म्हणून धावतील.

पश्चिम रेल्वे
www.wr.indianrailways.gov.in
आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly
आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly

कृपया सर्व आरक्षित तिकिटांसाठी वैध पुरावा जवळ ठेवा.